# झोपुप्रा पुणे अंतर्गत येणा-या सर्व झोपडपटटयावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील नोंदणीबाबतची कार्यपदधती

**सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी उददेश -**

१.पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व घोषीत झोपडपटटयांवर महाराष्ट सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार नियोजित/नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांची वेळेत निर्मीती करणे व त्यादवारे संस्था नोंदणीसाठी लागणारा कालपव्यय टाळणे.

२. पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व घोषीत झोपडपटटयांवर सहकारी गृहनिर्माण संस्था निर्माण करुन झोपडीधारकांना कायदेशीर व्यासपीठ उपलब्ध करुन देणे.

३.नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थाचे पदाधिकारी व झोपुप्रा पुणे यांचेमार्फत घोषित झोपडपटटी क्षेत्रावर झोपडपटटी पुनर्वसन योजनेचा योग्य प्रचार करुन योजना जलद गतीने मार्गी लावण्याकरीता प्रयत्न करणे .

**सहकारी गृहनिर्माण संस्था निर्मीतीचे फायदे -**

१.झोपडपटटी पुनर्वसन योजना पुर्ण करण्याकरीता सहकारी गृहनिर्माण संस्थेस विकसन प्रस्ताव दाखल करण्याची संधी मिळणार.

२.नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातुन योजनेचे सर्व्हेक्षण,झोपडीधारकांची पात्रता निश्चीत करण्यासाठी लागणा-या माहिती व कागदपत्रांचे संकलन इ.कामे करता येणार.

३.झोपडपटटी पुनर्वसन योजनेकरीता झोपडीधारक व झोपुप्रा कार्यालय यांच्यातील दुवा म्हणुन काम करण्याकरीता झोपडीधारकांना कायदेशीर नोंदलेली हक्काची संस्था उपलब्ध होणार.

४.एकुण झोपडीधारकांपैकी ५१ टक्के झोपडीधारकांच्या संमतीने संस्थेच्या माध्यमातुन विकसक निवडण्याची संधी मिळणार.

५.व्यक्तीगत तक्रारींचे संस्थास्तरावर निराकरण करणे सोयीचे होणार.

**प्रस्ताव कोण दाखल करु शकेल -**

१.संबंधित घोषीत झोपडपटटी क्षेत्रावरील रहीवाशी असलेले कायदयाने सज्ञान झोपडीधारक किंवा

२.योजना सुरु असल्यास संबंधित योजनेचे विकसक.

**नोंदणीकरीता आवश्यक कागदपत्रांची उपलब्धता -**

सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकरीता लागणारे आवश्यक फॉर्मस,परिशिष्टे,उपविधी इ.कागदपत्रे सहकार विभागाच्या https://sahakarayukta.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे .

## सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीच्या अनुषंगाने आवश्यक बाबींची माहिती -

१.सदर संस्थांची नोंदणी ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याअंतर्गतचे नियम १९६१ मधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

२.सदरची नोंदणी ही सहाय्यक निबंधक सहकारी संस्था झोपुप्रा पुणे यांचेमार्फत करण्यात येईल.

३.प्रस्ताव सादर करण्यात आलेल्या नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेचे कार्यक्षेत्र हे संबंधित सर्व्हे क्रमांक व योजनाक्षेत्रापुरते मर्यादीत राहील.

४.नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रस्तावावर संस्थेच्या कायक्षेत्रातील किमान ५१ टक्के झोपडीधारकांनी सभासदत्वासाठी स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.

५.नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेत सामील होणारे झोपडीधारक सभासद हे त्याच योजनाक्षेत्रातील असलेबाबतचे हमीपत्र मुख्य प्रवर्तक यांनी प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक राहील.

६.नियोजित गृहनिर्माण संस्थेचा एका योजनाक्षेत्रावर एकच नोंदणी प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील एकापेक्षा अधिक प्रस्ताव दाखल झाल्यास प्रथम दाखल केलेल्या प्रस्तावास परीपुर्ण असल्यास मान्यता देण्यात येईल.व तदनंतर दाखल होणा-या प्रस्तावातील झोपडीधारकांना पहिल्या नोंदणीकृत झालेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सभासद होणे आवश्यक राहील.

७.संबंधित योजना क्षेत्रावरील सर्व झोपडीधारकांना नियोजित संस्थेचे सभासद करुन घेणेची जबाबदारी संबंधित संस्थेचे मुख्य प्रवर्तक यांची राहील.

८.या कार्यालयाकडे दाखल करण्यात आलेला प्रस्ताव परिपुर्ण असल्याखेरीज तसेच संस्थेत सभासद म्हणुन दाखल झालेल्या सभासदांचे भागभांडवल प्रवेश फी, नोंदणी फी,इत्यादीचा भरणा केल्याखेरीज नियोजित संस्थेची नोंदणी केली जाणार नाही.

## संस्था नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे -

१.सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संपुर्ण परिशिष्टासह(अ,ब,क,ड परिशिष्ट) नोंदणीप्रस्तावाच्या दोन प्रती .

२.योजना क्षेत्रावर राहणा-या झोपडीधारकांची यादी (मशाल अथवा नवनिर्माण महिला बहुउददेशीय संस्थेकडील सर्व्हेक्षण यादी उपलब्ध असल्यास).

३.इच्छुक झोपडीधारक नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहत असलेबाबतचा पुरावा या करीता आधारकार्ड,निवडणुक ओळखपत्र,लाईटबिल,रेशनकार्ड इ.कागदपत्रांची स्वसाक्षांकित प्रत .

४.सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकरीता आवश्यक असणा-या सहभागीदारी गृहरचना संस्थेच्या उपविधीच्या दोन प्रती.

५.रुपये १००/- चे नॉन ज्युडीशियल स्टॅम्पपेपरवर मुख्य प्रवर्तक यांचे नमुना वाय मधील प्रतिज्ञापत्र.

६.रुपये १००/- चे नॉन ज्युडीशियल स्टॅम्पपेपरवर मुख्य प्रवर्तक यांचे नियोजित संस्थेमधील सामील सभासद यांना झोपुप्राच्या नियमाप्रमाणे पात्रतेबाबतची कल्पना देवुनझोपुप्राच्या नियमाप्रमाणे पात्र होणा-या झोपडीधारकांना घरे मिळणार असलेबाबतची माहिती सर्व सभासदांना दिलेबाबतचे प्रतिज्ञापत्र.

**प्रस्ताव या कार्यालयात दाखल झाल्यानंतर संस्था नोंदणीची कार्यपदधती -**

१.नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेचा नोंदणी प्रस्ताव संपुर्ण आवश्यक कागदपत्रांसह या कार्यालयातील सहकार विभागाकडे दाखल झाल्यानंतर सदर प्रस्तावाची छाननी करण्यात येईल व परिपुर्ण प्रस्तावाचे बाबतीत नियोजित संस्थेस संस्था कार्यक्षेत्रातील पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेत चालु खाते उघण्याकरीता मान्यता देण्यात येईल.

२.तदनंतर नियोजित संस्थेचे मुख्य प्रवर्तक यांनी संबंधित बँक खात्यावर संस्थेमध्ये दाखल झालेल्या सभासदांची भागभांडवल(रु.५००/-)व प्रवेश फी (रु.१००/-)प्रति सभासद या दराने जमा करावी व तसा बँक शिलकेचा दाखला सहकार विभागाकडे जमा करावा.

३.तदनंतर आठ दिवसांत सहकार विभागाकडुन संस्था नोंदणीबाबतचे शासकीय कोषागारात भरावयाचे नोंदणी फी चे चलन रु.२५००/- मुख्य प्रवर्तक यांचेकडे देण्यात येईल.सदर चलनाचा मुख्य प्रवर्तक यांचेमार्फत भरणा स्टेट बँक ऑफ इंडिया कोषागार शाखा(मेन ब्रॅन्च)येथे करुन त्याची एक प्रत सहकार विभागाकडे सादर करावी.

४. नियोजित संस्थेकडुन संस्था नोंदणीच्या अनुषंगाने सर्व आवश्यक बाबींची पुर्तता केले असल्याची खात्री झाल्यानंतर पुढील १० दिवसांत प्राधान्याने संस्था नोंदणीबाबतची कार्यवाही सहकार विभागाकडुन पुर्ण करण्यात येवुन मुख्य प्रवर्तक यांचेकडे संस्था नोंदणी प्रमाणपत्र सुपुर्द करण्यात येईल.

# सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीचे टप्पे

**झोपुप्रा पुणे अंतर्गत नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी प्रस्ताव (२ प्रतीत)**

↓

**नियोजित संस्थेचे मुख्य प्रवर्तक यांचेमार्फत झोपुप्रा पुणे कार्यालयात प्रस्ताव दाखल**

↓

**सहाय्यक निबंधक झोपुप्रा पुणे यांचेमार्फत प्रस्तावाची छाननी (१० दिवस)**

↓

**सहाय्यक निबंधक झोपुप्रा पुणे यांचेमार्फत संस्थेस बँक खाते उघडण्यासाठी परवानगी (८दिवस)**

↓

**नियोजित संस्थेकडुन सभासद भागभांडवल व प्रवेश फी चा भरणा (८ दिवस )**

↓

**सहाय्यक निबंधक झोपुप्रा पुणे यांचेकडुन नियोजित संस्था नोंदणीचे चलन मुख्य प्रवर्तक यांना अदा (२दिवस)**

↓

**मुख्य प्रवर्तक यांचेकडून नोंदणी फीचा भरणा केल्यानंतर**

↓

**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचेकडुन सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी (१०दिवस)**

**टिप - वरीलप्रमाणे गृहनिर्माण संस्था नोंदणीकरणाचा परिपुर्ण प्रस्ताव दाखल झाल्यानंतर ५० ते ६०दिवसांचे आत प्रत्यक्ष संस्थेच्या नोंदणीकरणाचे काम केले जाईल.**

**सहकार विभाग झोपुप्रा पुणे**